
# नेल्सन मंडेला

## स्वातंत्र्याचा दीर्घ प्रवास

संपादन: ख्रिस व्हान विक

चित्रे: पॅडी बौमा



"मी शांतता, लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या नावे आपल्या सर्वांना शुभेच्छा देतो!"



ही चित्रकथा *नेल्सन मंडेला: लाँग वॉक टू फ्रीडम* या पुस्तकाचे संक्षिप्त रूप आहे. विसाव्या शतकात जगात सर्वाधिक लोकप्रिय ठरलेल्या नेल्सन मंडेला या विलक्षण व्यक्तिचे हे आत्मचरित्र आहे. या पुस्तकातून आपण दक्षिण आफ्रिकेतील एक छोटेसे खेडे ते आफ्रिकी नॅशनल काँग्रेस आणि तुरुंग ते राष्ट्रपती पदापर्यंत झेप घेणाऱ्या मंडेला यांच्यासोबत प्रवास करतो. हे पुस्तक नेल्सन मंडेला फाउंडेशन यांच्या उदार सहकार्याने बनले आहे. ही चित्रकथा मंडेला यांचा स्फूर्तीदायक आवाज सादर करतो आणि बदल व समन्वय याचा संदेश भविष्यातील पिढ्याही ऐकू शकतील, याची खात्री देतो.

"हा सुंदर देश पुन्हा कधीही कुणाच्या दडपशाहीचा अनुभव ना घेवो...."



नेल्सन मंडेला यांचे घनिष्ठ मित्र *आर्चबिशप डेस्मंड टूटू* यांची वैयक्तिक श्रद्धांजली.

मी नेल्सन मंडेला (मदीबा) यांना 1950 च्या दशकात भेटलो. ते आमच्या कॉलेजात एका वाद-विवाद स्पर्धेसाठी पंच म्हणून आले होते. त्यानंतर 1990 मध्ये ते तुरुंगातून मुक्त होईपर्यंत आमची भेट कधीच झाली नाही.

मदीबाने तुरुंगात घालवलेल्या 27 वर्षांबद्दल ना कधी खेद व्यक्त केला ना तक्रार! ते शांततेचे पाईक होते. त्यांनी आपल्याला क्षमा या अत्यंत महत्त्वाच्या मूल्याची शिकवण दिली. राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाल्यावर त्यांनी त्यांच्या तुरुंगकाळातील एका सुरक्षारक्षकाला त्या समारंभाचे आमंत्रण दिले.

त्यांना लोकांची काळजी होती, म्हणूनच त्यांनी मोठ्या कष्टाने सेवाभावी संस्था उभारली, निधी गोळा केला. अशा मार्गांनी दक्षिण आफ्रिकेचे भविष्य उज्ज्वल करावे, अशी त्यांची मनिषा होती. मदीबाच्या मते, मुले ही भविष्याचा अपरिहार्य भाग आहेत. त्यांनी आपल्या वेतनातून *नेल्सन मंडेला बालकोश* उभारला. यातूनच या पुस्तकाची निर्मिती झाली आणि मुलांना त्यांच्या स्फूर्तीदायक कामाची ओळख होऊ शकली.



मदीबांबद्दल माझ्या सर्वात प्रिय आठवणी त्यांच्या मजेशीर स्वभावाबद्दल आहेत. एकदा मी त्यांच्या रंगीबेरंगी सदऱ्याची खिल्ली उडवली. ते उत्तरले की किमान ते माझ्यासारखं लोकांच्या समोर कपडे घालत नाहीत.

नेल्सन मंडेलांमुळे हे जग राहाण्यालायक बनलंय, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी आपल्याला एकमेकांना समजून घेण्याची, एकमेकांचा आदर करण्याची शिकवण दिली आहे.

ते एक विलक्षण व्यक्ती होते. ते माझे मित्र होते, हे मी माझं भाग्य समजतो.

# नेल्सन मंडेला




मराठी अनुवाद: सुशील मेन्सन






माझं नाव *नेल्सन मंडेला.* मी आफ्रिका खंडाच्या टोकाला असलेल्या दक्षिण आफ्रिका या सुंदर देशात राहातो. आज दक्षिण आफ्रिका हा लोकशाही देश आहे. याचा अर्थ, सर्व प्रौढ नागरीक मतदान करून देश चालवणाऱ्या व्यक्तिंची निवड करतात. पण पूर्वी देशात अशी व्यवस्था नव्हती.

माझा जन्म झाला तेव्हा दक्षिण आफ्रिकेवर गोऱ्या लोकांचं राज्य होतं. मी मोठा झालो तसं मला हे अन्यायकारक वाटू लागलं. मला राज्य चालवण्याची ही पद्धत बदलावीशी वाटू लागली. सरकारमध्ये सर्व लोकांना आवाज असावा, असं मला वाटू लागलं. मी आणि माझे मित्र याला स्वातंत्र्याचा लढा म्हणू लागलो. हा लढा कित्येक वर्षे सुरू राहिला. मी या लढ्यातील एक सैनिक होतो. ही माझी कथा आहे....







फार फार वर्षांपूर्वी, गोरे युरोपीय समुद्र पार करून दक्षिण आफ्रिकेत आले. त्यांनी येथील जमीन बळकावण्यासाठी युद्ध केलं. इथे आधीपासून राहाणाऱ्या *होसा, झुलू* आणि *त्स्वाना* जमातींशीही त्यांनी लढाई केली.

याच्या शेकडो वर्षांनंतर, *थेंबू* जमातीमध्ये माझा जन्म झाला. ही होसा राष्ट्रात राहाणाऱ्या अनेक जमातींपैकी एक जमात होती. 18 जुलै 1918 रोजी, दक्षिण आफ्रिकेचे रमणीय भूशिर *म्वेझो* या गावात जन्म घेऊन मी या जगात प्रवेश केला.

माझे वडील थेंबू जमातीचे प्रमुख होते. ते आमच्या जमातीचे नेता होते. त्यांनी माझं नाव *रोलीह्लाह्ला* ठेवलं. होसा भाषेत याचा अर्थ होतो, *संकटं उभी करणारा.* खरंच त्यांना असं वाटत होतं का की मोठा होऊन मी संकटं उभी करणार आहे? मला नाही वाटत. माझ्यापुढे काय वाढून ठेवलंय, हे कुणालाच माहीत नव्हतं.

मी लहान होतो तेव्हा आम्ही म्वेझोहून नजिकच्या *कुनू* गावात गेलो. मी आमच्या कुटुंबाच्या शेळ्या-मेंढ्यांना चरायला नेऊ लागलो. ते दिवस खूप सुखाचे होते. माझे मित्र आणि मी नदीत पोहायचो, मधाच्या पोळ्यातला मध चोरायचो आणि लाठ्या-काठ्यांनी होसा मुलांचा आवडता लढाईचा खेळ खेळायचो.





मी सात वर्षांचा झालो तेव्हा वडिलांनी मला शाळेत पाठवायचा निर्णय घेतला. ती एक मिशनरी शाळा होती. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी युरोपातून आलेल्या मिशनऱ्यांनी ही शाळा सुरू केली होती. माझ्या कुटुंबातील कुणी पूर्वी शाळेत गेले नव्हते. माझ्याकडे धड कपडे नव्हते, म्हणून माझ्या वडिलांनी आपली एक जुनी पँट गुडघ्यापासून कापून मला घालायला दिली. या ढगळ पँटवर मी पट्टा म्हणून एक दोरीचा तुकडा बांधायचो. ही शाळा भपकेदार नव्हती, त्यात फक्त एकच खोली होती. इतर विद्यार्थ्यांचे कपडे माझ्या कपड्यांपेक्षा बरे नव्हते, त्यामुळे मी अवघडलो नाही.

आमच्या शिक्षिकेने आम्हाला नवी नावं दिली. मला नेल्सन हे नाव दिलं. नेल्सन? त्याकाळी इंग्रज आमच्या देशावर राज्य करत होते. त्यामुळे आमच्या शिक्षिकेने विचार केला की आमची नावं इंग्लिश पद्धतीची असावीत. सुरुवातीला, ही नावं ऐकायला विचित्र वाटली, पण नंतर त्यांची सवय झाली.




मी शाळेत शिकत होतो, तसा घरीसुद्धा शिकत होतो. माझी आई लहानपणापासूनच मला जुन्या काळच्या गोष्टी सांगत असे. त्यात इतरांशी दयाळूपणे वागावं, यासारखी नीतीमूल्यं असत.



माझ्या वडिलांनी मला शूर होसा बनायला शिकवलं. मी मोठा होऊन त्यांच्यासरखंच बनायचं, असं ठरवलं होतं. काहीवेळा, मी माझे केस वडिलांसारखे राखाडी दिसावेत म्हणून केसांना राख चोळायचो.

पण माझ्या नवव्या वाढदिवसानंतर माझं आयुष्य बदललं. माझे वडील आजारी पडले आणि त्यांचं निधन झालं. आईने मला वडिलांचे मित्र प्रमुख *जोंगिनताबा* यांच्यासोबत राहाण्यास नजिकच्या *म्कवेज्वेनी* गावात पाठवलं. जोंगिकाका थेंबू जमातीचे काळजीवाहू राजा होते. त्यामुळे ते खूप महत्त्वाचे व्यक्ती होते. त्यांच्याकडे मोटारगाडी होती आणि ते एका मोठ्या घरात राहात. माझ्यासाठी हा अनुभव उत्तेजित करणारा होता! आई कधीकधी मला भेटायला तिथे येत असे. तिला पाहून मला खूप आनंद होत असे.





मला माझ्या कुनू गावाची खूप आठवण येत असे. पण मला हे नवं आयुष्यही आवडायचं. जोंगिकाकांचा मुलगा, *जस्टीस*, वयाने माझ्यापेक्षा काही वर्षांनी मोठा होता. आम्ही घोड्यांवर स्वार व्हायचो आणि त्याच्या वडिलांची शेतं नांगरायचो. खूप मजा करायचो आम्ही!

पण आयुष्य हे फक्त घोडेस्वारी आणि मजामस्ती नसतं. मी सोळा वर्षांचा झाल्यावर, जोंगिकाकांनी मला क्लार्कबरी बोर्डिंग शाळेत पाठवलं. त्याकाळी, बरीच मुलं-मुली शाळा मध्येच सोडत. पण माझ्या काकांना शिक्षण आवश्यक आहे, असं वाटे. तीन वर्षांनंतर, मी देशातील आफ्रिकी लोकांची सर्वात मोठी शाळा, हेल्डटाऊनमध्ये प्रवेश घेतला. जस्टीसही तिथे शिकत होता. तिथेच मी माझं हायस्कूलचं शिक्षण पूर्ण केलं.

वयाच्या एकविसाव्या वर्षी, मी *फोर्ट हेअर* या कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांच्या विद्यापीठात प्रवेश घेतला. हे विद्यापीठ पूर्व किनाऱ्यावर होतं. जोंगिकाकांनी माझ्यासाठी एक नवा सूट विकत आणला. शाळेत असताना मी कापून अर्धी केलेली पँट घालायचो, त्यापेक्षा हे खूप वेगळं होतं. मला असं वाटू लागलं की मी खूप मोठा झालोय.

फोर्ट हेअर येथे शिकण्यासाठी देशभरातून कृष्णवर्णीय विद्यार्थी येत. तिथे मला *सोदो, झुलू* आणि *त्स्वाना* जमातीचे लोक प्रथमच भेटले.

तिथे मला नवे मित्र मिळाले. *ऑलिव्हर ताम्बो* नावाचा एक हुशार विद्यार्थी मला तिथे भेटला. भविष्यात आम्ही एकमेकांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहोत, याची तेव्हा आम्हा दोघांनाही कल्पना नव्हती.





विद्यापीठात असताना मी कठोर मेहनत केली, पण सोबतच मौजमस्तीही केली. मी धावणे, मुष्टीयुद्ध आणि बॉलरुम नृत्य शिकलो. एकदा माझे मित्र आणि मी रात्रीच्या वेळी नृत्य सभागृहात गेलो. आम्ही स्वत:ला मोठे धाडसी समजत होतो. मग तिथे आम्हाला आमचे शिक्षक भेटले!

अचानक माझे विद्यार्थीदशेतील दिवस संपले. मला विद्यार्थी परिषदेवर सदस्य म्हणून निवडण्यात आलं. पण फक्त पंचवीस विद्यार्थ्यांनी मतं दिली होती. बहुतांशी विद्यार्थ्यांनी मतदानाकडे पाठ फिरवली होती. कारण ही परिषद, कॅफेटोरियातल्या वाईट दर्जाच्या जेवणासारख्या महत्त्वाच्या समस्येकडे दुर्लक्ष करते, असं त्यांचं म्हणणं होतं. मी प्रिन्सीपलना म्हटलं की विद्यार्थ्यांच्या मदतीशिवाय मी परिषदेत सहभागी होऊ इच्छित नाही. त्यांनी मला विद्यापीठातून काढून टाकण्याची धमकी दिली. पण मी माझा निर्णय बदलला नाही. मी विद्यापीठात पुन्हा पाऊल टाकलं नाही. मी *संकटं उभी करणारा* या माझ्या नावाचं सार्थक करत होतो का?

दुसरीकडे, आमच्या मोठ्या घरात, जोंगिकाकांनी माझ्यासाठी आणि जस्टीससाठी काही वेगळाच विचार सुरू केला होता. त्यांनी आमच्या प्रत्येकासाठी पत्नी निवडली होती आणि आम्ही लग्न करावं अशी त्यांची इच्छा होती. आम्हाला धक्काच बसला! आम्हाला इतक्यात लग्न करायचं नव्हतं. म्हणून आम्ही जोहान्सबर्गला पळून जायचं ठरवलं.






जोहान्सबर्ग चारशे मैलांपेक्षा जास्त दूर होते. आम्ही होसा जमातीचे लोक त्याला *इगोली* म्हणायचो, याचा अर्थ आहे सोन्याचा प्रदेश. तिथे आम्ही नोकरी शोधणार होतो, आमचं आयुष्य घडवणार होतो. हा विचार धाडसी होता, पण आम्हाला पुरेपूर आशा होती. आमच्या भविष्याबद्दल आम्ही उत्तेजित होतो. आम्ही या मोठ्या शहराच्या लखलखत्या दिव्यांच्या दिशेत निघालो.

जोहान्सबर्ग आमच्या कल्पनेपेक्षा खूप मोठं होतं. जिथे बघावं तिथे लोक, दुकानं आणि मोटारी होत्या. पण ती सगळी आकर्षक दुकानं आणि महागड्या मोटारी गोऱ्यांच्या मालकीची होती. बहुतांशी कृष्णवर्णीय लोक गरीब होते.

मी शहरालगत असलेल्या *अलेक्झांड्रा* उपनगरात राहायला गेलो. तेथील लहानखुऱ्या घरांमध्ये ना वीज होती ना पाणी. तेथील रस्ते कच्चे होते. अलेक्झांड्रामध्ये आयुष्य खडतर होतं, तरीही ते माझं घर बनलं.

जस्टीस काही काळापुरता जोहान्सबर्गमध्ये राहिला. काही वर्षांनंतर, जोंगिकाकांचा मृत्यू झाला आणि तो प्रमुखपद सांभाळण्यासाठी पूर्व तटाला परतला.




तिथे माझ्या नवनव्या लोकांशी भेटीगाठी झाल्या. काही माझे घनिष्ठ मित्र बनले. त्यांतीलच एक होता, *वॉल्टर सिसुलू*. वॉल्टर आणि त्याचं कुटुंब जोहान्सबर्गनजिक असलेल्या *सोवेटो* शहरातील ओरलँडो वेस्ट या भागात राहात. माझ्यासारखंच तोसुद्धा पूर्व तटावरून आला होता. पण तो बराच काळ जोहान्सबर्गमध्ये राहिला होता आणि त्याला शहरातील लोकांची आणि ठिकाणांची बरीच माहिती होती.






मी माझा बराच वेळ सिसुलूंच्या घरात घालवत असे. तिथेच माझी भेट सिसुलूंची नातलग *एव्हलीन मेस हिच्या*शी झाली. ती नर्स होती, तरूण होती. आम्ही प्रेमात पडलो आणि मग लग्न केलं. आम्हाला दोन मुलं आणि दोन मुली झाल्या. पण एक मुलगी फार काळ जगू शकली नाही. दुर्दैवाने, मी आणि एव्हलीन वेगळे झालो. पण मी आमची मुलं, *थेम्बेकाईल, मॅगॅथो* आणि मुलगी *मकाझिव* यांच्या संपर्कात राहिलो.

सिसुलू कुटुंबात, माझी भेट माझा जुना मित्र ऑलिव्हर ताम्बो याच्याशी पुन्हा झाली. आम्ही दोघं कायद्याचा अभ्यास करत होतो. 1952 साली, आम्ही दक्षिण आफ्रिकेत कायद्यासंदर्भात काम करणारी पहिलीवहिली कृष्णवर्णीय कंपनी सुरू केली.



पण कृष्णवर्णीय लोकांचे आयुष्य सुधारण्याचा आणखी एक मार्ग होता. जेव्हापासून गोरे लोक दक्षिण आफ्रिकेत आले, तेव्हापासून ते कृष्णवर्णीय लोकांवर राज्य करत आहेत. माझा मित्र, वॉल्टर *आफ्रिकी राष्ट्रीय काँग्रेस, एएनसी*चा अध्यक्ष होता. ही संघटना कृष्णवर्णीय लोकांच्या स्वातंत्र्यासाठी, स्वराज्यासाठी झगडत होती. ऑलिव्हर आणि मीसुद्धा या संघर्षात सहभागी झालो. आम्ही वॉल्टरच्या घरी विचार-विनिमय करू लागलो की या लढ्याकडे सरकारचे लक्ष कसे वेधता येईल.

1944 साली, आम्ही *एएनसी युवा लीग*ची स्थापना केली आणि हजारो कृष्णवर्णीय तरुणांना लढ्यासाठी प्रेरित करण्याची योजना आखली. आम्ही शांततेने आमच्या स्वातंत्र्याची मागणी करत रस्त्यांवर चालत निषेध व्यक्त करू लागलो. आता आम्हाला कुणी दुर्लक्षित करू शकणार नव्हतं.






1948 साली, सरकारने वर्णभेदाचे नवे कायदे (*अपार्थिड*) संमत केले. या कायद्याने लोकांची काळे आणि गोरे अशी विभागणी केली. गोरे लोक उपनगरांत राहात आणि काळे लोक नजिकच्या वस्त्यांमध्ये. सरकारने त्यांच्यासाठी वेगवेगळ्या शाळा, चर्च आणि सिनेमाघरं बांधली. टपाल कार्यालये आणि दुकानांमध्ये त्यांच्यासाठी वेगवेगळी प्रवेशद्वारं ठेवली.

आता सोळा वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या काळ्या लोकांना आपल्याजवळ सतत एक पासबुक ठेवणं बंधनकारक झालं. त्यात त्यांची ओळख, त्यांच्या कामाची जागा आणि राहाण्याचा पत्ता लिहिलेले असे. आमच्याकडे पासबुक नसेल तर, आम्हाला तुरुंगात टाकत असत.

अपार्थिड ही एक क्रूर व्यवस्था होती. या कायद्यामुळे, दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक व्यक्तिला त्याच्या वर्णानुसार काळा, पिवळा किंवा गोरा अशी श्रेणी मिळू लागली. गोरे नसलेल्या लोकांवर याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येऊ लागले. या कायद्यामुळे मी आणि आमचे लोक नाराज झाले. 1952 साली, आम्ही याचा निषेध म्हणून एक कायदेभंग मोहीम सुरू केली. आम्ही टपाल कार्यालये, दुकाने आणि रेल्वे अशा सर्व ठिकाणी असलेली *फक्त गोऱ्यांसाठी* ही सूचना दुर्लक्षित करण्यास काळ्या लोकांना सांगितलं. 250 पेक्षा जास्त लोकांना अटक झाली, तरीही हजारो लोक आमच्या मोहिमेत सहभागी झाले.

सरकारने अपार्थिड कायदा रद्द केला नाही, पण एएनसीला मात्र असंख्य नवे सदस्य मिळाले. आमचं बळ वाढत चाललं. सरकारने मला एएनसी सभांमध्ये सहभागी होण्यास आणि अपार्थिडचा निषेध करण्यास मनाई केली. मग मी गुप्तपणे एएनसीसाठी काम करू लागलो.



फक्त काळे लोकच अपार्थिडच्या विरुद्ध होते, असं नव्हतं. हजारो पीतवर्णीय, भारतीय आणि गोरे दक्षिण आफ्रिकी लोकही याच्या विरुद्ध होते. 1950 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात, या सर्व लोकांनी एकत्र येऊन काँग्रेस युती बनवली. मग 1955 मध्ये, एएनसी आणि युतीचे इतर लोक स्वातंत्र्याची सनद तयार करण्यासाठी जोहान्सबर्गनजिक असलेल्या *क्लिपटाऊन* उपनगरात भेटले. *लोकांची काँग्रेस* अशी ओळख मिळालेली ही सभा आणि सनद, हे दक्षिण आफ्रिकी लोकांचे स्वातंत्र्य आणि लोकशाही यांसाठी लढा देण्याचे एक वचन होते.


THE FREEDOM CHARTER

We the people of South Africa, declare for all our country and the world to know : That South Africa belongs to all who live in it, black and white . . .



सरकारला आमची सनद अजिबात पसंत पडली नाही. त्यांनी ऑलिव्हर, वॉल्टर आणि माझ्यासह 156 काँग्रेस सदस्यांना अटक केली. आमच्यावर सरकारला उलथवून टाकण्याचा कट केल्याचा आरोप ठेवला गेला. हा खटला तब्बल चार वर्षे चालला, पण शेवटी, आम्ही दोषी नाही, हे सिद्ध झालं.

या दरम्यान, मी पुन्हा प्रेमात पडलो. *विन्नी मॅडिकेझेला* ही एक समाजसेविका होती आणि एएनसीची सदस्याही होती. आम्ही 1958 साली लग्न केलं. आम्हाला दोन मुली, *झेनानी* आणि *झिन्दजी*, झाल्या.



1960 साली, आमच्या खटल्यादरम्यान, एक दुर्घटना घडली. त्याने सारं जग हादरून गेलं.

जोहान्सबर्गनजिकच्या *शार्पविले* उपनगरात पाच हजार लोकांनी पोलीस ठाण्यावर मोर्चा नेला आणि पासबुक ठेवण्याच्या नियमाचा निषेध केला. हे सर्व लोक निःशस्त्र होते. तरीही पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला.

यात एकोणसत्तर लोक ठार झाले आणि चारशे लोक जखमी झाले.






शार्पविलेच्या दुर्घटनेनंतर, सरकारने एएनसी आणि स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या इतर संघटनांवर निर्बंध आणले. सरकारला शासनात काळ्या लोकांचा सहभाग नको होता. आमचं शांततापूर्ण आंदोलन निरुपयोगी ठरलं, तरीही आम्ही प्रयत्न सोडून दिले नाहीत. आम्ही विचार केला की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आमच्याकडे एकच मार्ग उरला आहे. सरकारशी त्याच पद्धतीने लढायचं ज्या पद्धतीने ते आमच्याशी लढतं - बंदुकांनी.

एएनसीने एक सैन्य बनवलं. त्याला आम्ही *अमकाण्डो वी सिझवे* असं म्हणू लागलो. होसा भाषेत याचा अर्थ होतो, *राष्ट्राचा भाला.* मला एका गुप्त मोहिमेवर परदेशात पाठवण्यात आलं. इतर देशांकडून मी आमच्या लढ्याला पाठिंबा मिळवणार होतो. मी सैनिकी प्रशिक्षणसुद्धा घेतलं.

1962 साली, मी *डेव्हीड मोसामाई हे* नाव घेतलं आणि खोटा पासपोर्ट बनवून दक्षिण आफ्रिकेत परतलो. कित्येक महीने मी लपूनछपून राहिलो. पोलीस सर्वत्र नेल्सन मंडेलाचा शोध घेत होते.

मग ऑगस्ट महिन्यात एकदा, त्यांनी माझी कार अडवली आणि मला अटक केली. मला अवैध रितीने देश सोडण्याच्या आणि कामगारांना संप करण्यास चिथावण्याच्या आरोपाखाली पाच वर्षे कैदेची शिक्षा झाली. नंतर, पोलिसांनी माझ्या इतर साथीदारांनाही अटक केली. त्यात वॉल्टर सिसुलूसुद्धा होता. माझ्या कैदेचे नऊ महिने झाल्यावर मला सांगण्यात आलं की माझ्यावरचा खटला पुन्हा एकदा चालवण्यात येणार आहे. यावेळी आमच्यावर सरकार उलथून टाकण्याचा कट रचल्याचा आरोप ठेवला. हा आरोप न्यायालयात सिद्ध झाला तर आम्हाला फाशी होणार होती.





हा नवा खटला ऑक्टोबर 1963 साली सुरू झाला आणि एप्रिल 1964 पर्यंत चालला. मी सर्वांचा बचाव करण्याची भूमिका वठवली. मी न्यायाधीशांना सांगितलं की एएनसी ही शांतताप्रिय काम करणारी संस्था आहे पण सरकारने संस्थेवर निर्बंध आणल्यामुळे शांततापूर्ण मार्गाने निषेध व्यक्त करण्याचा मार्ग आमच्याकडे उपलब्ध नाही. आम्हाला एकतर तुरुंगात डांबतात वा ठार मारतात. यामुळेच आम्ही बंदुकांनी लढा देण्याचा मार्ग स्वीकारला. मी म्हणालो, “मी नेहमी लोकशाहीच्या आदर्शांना मानतो. या लोकशाहीत सर्व लोक गुण्यागोविंदाने राहातात....या आदर्शासाठी मी मरायलाही तयार आहे.



आमच्यातील आठजणांना दोषी ठरवण्यात आले. पण आम्हाला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली नाही. त्याऐवजी, आम्हाला जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. आयुष्यभर कैदेत! मी पुन्हा कधी माझ्या पत्नीला, बायकामुलांना बघू शकेन का?

आम्हाला केप टाउन किनाऱ्यापासून दूर असलेल्या रोबेन बेटावरील तुरुंगात नेले. फक्त *डेनिस गोल्डबर्ग*ला सोडून. आम्हा आठ जणांपैकी तोच एक गोरा माणूस होता. त्याला त्याची शिक्षा भोगण्यासाठी वेगळ्या तुरुंगात ठेवण्यात आलं.

रोबेन बेटावर माझी कोठडी अत्यंत छोटी होती. मी चटईवर आडवा पडलो की माझे पाय समोरच्या भिंतीला आणि हात मागच्या भिंतीला स्पर्श करत. मला काही पातळ घोंगड्या देण्यात आल्या आणि संडासासाठी एक बादली. आता हेच माझं घर असणार होतं.

मी आशावादी राहायचा प्रयत्न करत राहिलो, पण ते एवढं सोपं नव्हतं. सुरुवातीला, आम्ही वर्षातून फक्त दोन माणसांना भेटू शकत होतो आणि प्रत्येकाला फक्त दोन पत्रं मिळू शकत होती. आम्हाला येणारी पत्र अगोदर तुरुंगाचा सुरक्षारक्षक वाचत असे. एखादा मजकूर आम्हाला कळणं योग्य नाही, असं त्याला वाटलं की तो मजकूर काळा करत असे.

मला घरून दोन वाईट बातम्या मिळाल्या. आधी मला सांगण्यात आलं की माझ्या आईचा मृत्यू झाला. मग माझा मोठा मुलगा, थेंबरकाईल, एका कार अपघातात गेला. या बातम्या मिळाल्या ते संपूर्ण दिवस मी माझ्या कोठडीत मुलाबद्दल आणि माझ्या कुटुंबियांबद्दल विचार करत राहिलो. माझ्या आयुष्यातील ते सर्वाधिक दु:खद दिवस होते.





आम्हाला रेडिओ ऐकायची किंवा वृत्तपत्र वाचायची परवानगी नव्हती. आठवडे, महिने, वर्षे एकामागोमाग निघून गेले. जगात काय चाललं आहे, त्याचा आम्हाला पत्ताच नव्हता. एकदा मी पाहिलं की एक तुरुंगाधिकारी आपलं वृत्तपत्र खुर्चीवर सोडून गेला आहे. मी झडप घालून ते हाती घेतलं आणि वाचू लागलो. पण मी पकडला गेलो आणि तीन दिवस मला एका कोठडीत डोंबण्यात आलं. तिथे मला भूक भागवायला पेजेच्या पाण्याशिवाय इतर कोणतंच अन्न मिळालं नाही.

वर्षे हळूहळू निघून गेली. पाच वर्षे....दहा....वीस. माझे केस राखाडी करायला आता मला राखेची गरज नव्हती!

पण तुरुंगाबाहेर, स्वातंत्र्यासाठी लढा सुरूच होता.

दक्षिण आफ्रिकेत एएनसी संघटनेवर बंदी घालण्यात आली, तरी तिने देशाबाहेर हातपाय पसरले होते. ऑलिव्हर ताम्बो परदेशात राहात होता आणि तो एएनसीची अध्यक्ष होता. जगभरातील अनेक देशांचे सरकार आम्हाला पाठिंबा देऊ लागले होते.

1980 च्या दशकात, एएनसीने *मंडेलांना मुक्त करा* असं आंदोलन सुरू केलं. दक्षिण आफ्रिका सरकारवर दबाव आणून माझी आणि माझ्या सहकाऱ्यांची सुटका करण्याचं आणि एएनसीवरील निर्बंध हटवण्याचं आवाहन त्यांनी जगभरातील लोकांना केलं. हजारो लोकांनी या याचिकेवर हस्ताक्षर केलं.

मग मार्च 1982 मध्ये, वॉल्टर, इतर काही कैदी आणि मला केप टाउननजिकच्या *पोल्समूर* तुरुंगात हलवण्यात आलं. परिस्थिती बदलत होती, याचं हे निदर्शक होतं काय? आमचा स्वातंत्र्याचा लढा शेवटाकडे चालला होता, आशी आशा करण्याचं धाडस करता येईल का? सरकार आणि माझ्यात शांततेबद्दल गुप्त बैठका होऊ लागल्या.





1988 साली, मला *व्हिक्टर व्हर्स्टर* तुरुंगात हलवलं गेलं. पण तिथे कोठडीऐवजी मला एक घर देण्यात आलं. त्यात शयनखोली, स्वयंपाकघर आणि पोहोण्यासाठी तलावसुद्धा होता!



सरकार आणि माझ्यात चर्चा सुरू राहिली. डिसेंबर 1989 मध्ये, मी राष्ट्रपती डी क्लर्क यांना भेटलो. आम्ही एका नव्या दक्षिण आफ्रिकेबद्दल चर्चा केली. मग गोष्टी भराभर पुढे सरकू लागल्या.

ऑक्टोबर 1989 मध्ये, रोबेन बेटावरील माझ्या अनेक सहकाऱ्यांची, वॉल्टर सिसुलूसमवेत, सुटका करण्यात आली. मग राष्ट्रपती *डी क्लर्क* यांची आणि माझी बैठक झाल्यावर दोन महिन्यांनंतर 2 फेब्रवारी 1990 रोजी राष्ट्रपतींनी माझ्या आणि इतर राजकीय कैद्यांच्या सुटकेची घोषणा केली आणि जगाला स्तंभित केलं. ते म्हणाले की एका नव्या राष्ट्राच्या निर्मितीबद्दल चर्चा करण्याची वेळ आली आहे.



11 फेब्रुवारी 1990 रोजी मी तुरुंगातून बाहेरच्या जगात प्रवेश केला. मी रोबेन बेटावर आलो त्याला सत्तावीस वर्षे होऊन गेली होती. पण स्वातंत्र्याचा हा दीर्घ प्रवास आता पूर्ण होत आला होता.

माझ्या पत्नीला, विनिला, पुन्हा बाहुपाशात घेणं, मोठं झालेल्या माझ्या चार सुंदर मुलांना बघणं, माझ्या नातवांचं हसणं-खिदळणं ऐकणं, त्यांचं मला आजोबा म्हणणं हा सारा अनुभव माझ्यासाठी अद्भूत होता.

दररोज आमचं सोवेटोचं घर हास्याने आणि आनंदाश्रुंनी भरू लागलं. गेली सत्तावीस वर्षं भेट न झालेली मित्रमंडळी माझं स्वागत करायला घरी येऊ लागली.





आमच्या सुटकेनंतर, भरपूर काम करायचं बाकी होतं. एएनसी आणि सरकार हे शांतता आणि काळे-गोरे एकत्र नांदू शकतील असा दक्षिण आफ्रिका देश, यांवर चर्चा करू लागले.

27 एप्रिल 1994 रोजी, लाखो तरूण आणि वयस्कर लोक मतदान करण्यास घराबाहेर पडले. काळ्या लोकांसाठी मतदान करण्याची ही पहिलीच संधी होती. त्यांनी गोऱ्या लोकांसोबत नवा दक्षिण आफ्रिका घडवण्यासाठी मतदान केलं. काय विलक्षण दिवस होता तो!



मे 1994 मध्ये, मी दक्षिण आफ्रिकेच्या लोकांनी निवडून दिलेला पहिला राष्ट्रपती बनलो. मी 75 वर्षांचा झालो होतो. माझा स्वातंत्र्याचा प्रवास समाप्त झाला.

पण सोबतच एक नवा प्रवासही सुरू झाला – एका नव्या दक्षिण आफ्रिकेच्या निर्मितीचा प्रवास. आम्ही सर्वांनी एकमेकांचा हात धरून म्हणायचं होतं की आम्ही एक राष्ट्र आहोत, भविष्याच्या दिशेत सरसावणारा एक देश आहोत, एक समाज आहोत. एक असं भविष्य ज्यामध्ये सर्व वर्णांचे लोक शांततेने राहाण्यास शिकू शकतील.



*नेल्सन मंडेला हे पाच वर्षेदक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती होते. आपल्या वचनानुसार ते निवडणुकीचा एकच काळ राष्ट्रपती राहिले. 1999 साली त्यांनी आपल्या पदाचा त्याग केला. पण हे जग सर्वांना राहाण्यालायक बनवण्यासाठी ते जगभरातील नेत्यांसोबत काम करत राहिले. त्यांनी नेल्सन मंडेला बाल कोश, नेल्सन मंडेला फाउंडेशन आणि मंडेला ऱ्होड्स फाउंडेशन उभारले.*



*दरवर्षी 18 जुलै रोजी त्यांच्या वाढदिवशी, आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला दिवस साजरा केला जातो. लोक या दिवशी किमान 67 मिनिटे इतरांसाठी काही काम करतात. यातील प्रत्येक मिनिट नेल्सन मंडेला यांनी स्वातंत्र्यासाठी आणि शांततेसाठी खर्ची केलेल्या 67 वर्षांच्या संघर्षातील एकेका मिनिटाचे प्रतिनिधित्व करतो.*

*5 डिसेंबर 2013 रोजी, वयाच्या 95 व्या वर्षी, नेल्सन मंडेला यांचं निधन झालं. पण त्यांची स्मृती आजही जिवंत आहे. ती आपल्या सर्वांना सदोदीत स्फूर्ती देते, कुणालाही दडपशाही व दारिद्र्य भोगावं लागू नये अशा जगाचा दिलासा देते.*

समाप्त